MHRG060010832025

**दिवाणी कि. अर्ज क्र.११८/२०२५**
**शुभदा काशीकर व इतर वि. कोणीही नाही**

## निशाणी क्र.१ वरील आदेश.

अर्जदार क्र.१ ते ३ यांनी सदरचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २–अ नुसार वारस दाखला मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**२.** अर्जदार क्र.१ यांचे पती आणि अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील कै. दिलीप शंकर काशीकर हे दि.२९/०३/२०२५ रोजी मयत झाले आहेत. कै. दिलीप शंकर काशीकर यांची आई कै. कुसुम शंकर काशीकर यापुर्वीच मयत झालेल्या आहेत. अर्जदार क्र.१ ते ३ हे कै. दिलीप शंकर काशीकर यांचे कायदेशीर वारस आहेत. तसा दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

**३**. या अर्जाच्या कामी नोटीस काढण्यात आली. सदरची नोटीस स्थानिक वृत्तपत्र रायगड वृत्तवेधमध्ये दि.११/१०/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली. ती **नि.क्र. १३** कडे दाखल आहे. दि.११/१०/२०२५ पासून आजपर्यंत या अर्जाला कोणीही हरकत उपस्थित केलेली नाही. तसेच दि.१०/१०/२०२५ रोजी **नि.क्र. ७** वरील जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला. सदर जाहिरनाम्यास कोणीही हरकत घेतली नाही.

**४.** या अर्जाच्या कामी अर्जदार यांनी कै. दिलीप शंकर काशीकर यांच्या मृत्यूच्या दाखल्याची मुळ प्रत **नि.क्र. १२** कडे दाखल केलेली आहे. कै. दिलीप शंकर काशीकर यांची आई यापूर्वीच मयत झालेल्या असल्याकारणाने अर्जदार यांनी सदरील व्यक्ती मयत असल्याचे व तिचा मृत्यूचा दाखला उपलब्ध नसल्याचे प्रतिज्ञापत्र **नि.क्र. १५** कडे दाखल केलेली आहे. अर्जदार क्र.१ ते ३ यांनी आपल्या ओळखपत्राच्या व्हेरिफाईड प्रती आणि

रेशनकार्डच्या व्हेरिफाईड प्रती **नि.क्र. ४** वरील यादीसोबत दाखल केलेल्या आहेत. अर्जदारांतर्फे पुरावा संपल्याची पुरशीस **नि.क्र. १७** कडे दाखल केली आहे.

**५.** अर्जदार क्र.१ याने या अर्जाच्या कामी **नि.क्र. १६** वर आपला पुरावा नोंदविलेला आहे. अर्जदार क्र.१ याने सादर केलेल्या पुराव्यावरुन कै. दिलीप शंकर काशीकर यांना अर्जदार क्र.१ ते ३ हे सरळ कायदेशीर वारस असल्याचे दिसून येत आहे. अर्जदार क्र.१ ते ३ यांना सदरचा वारस दाखला कायदेशीर कामाकरिता आवश्यक असल्याने त्यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. सबब, पुरावा पहाता अर्जदार क्र.१ ते ३ हे कायदेशीर वारस असल्याची औपचारिकपणे मान्यता देण्यात येत आहे.

## आदेश

**१.** अर्जदार क्र.१ ते ३ यांचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**२.** अर्जदार क्र.१ ते अर्जदार क्र.३ हे कै. दिलीप शंकर काशीकर यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार क्र.१ ते ३ यांना औपचारिकपणे वारस घोषीत करून वारस दाखला देण्यात येत आहे.

**३.** वारसाचे प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन कायदयाप्रमाणे अर्जदारांनी योग्य तो मुद्रांक शुल्क भरल्यानंतर देण्यात यावे.

ANUJA ANIL KALE
Digitally signed by ANUJA ANIL KALE
Date: 2026.04.02 10:41:08 +0530

**पेण.** **(श्रीमती अ. अ. काळे)**

**दिः ०१.०४.२०२६.** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पेण.**